वाहतुक शाखा, पुणे शहर
पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ ६९०५ /२०२३ दिनांक :- २६/ ९ /२०२३

-: प्रसिध्दीपत्रक :-

**गणेशविसर्जन २०२३ निमित्त ससाणेनगर, हडपसर परिसरातील वाहतूक व्यवस्थेतील बदलाबाबत**

गणेशोत्सव विसर्जन मिरवणुकीचे वेळी ससाणेनगर, हडपसर येथील नवनाथ चौक ते हिंगणेमळा नवीन कॅनल या रोडवर गणेश विसर्जनाकरीता गणेश मंडळांची रांग लागत असते. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे.

गणेश विसर्जनादरम्यान सदर परिसरातील वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे चालावी याकरीता शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन खालीलप्रमाणे वाहतूक बदलाबाबतचे आदेश निर्गमित करीत आहे.

**वाहतूकीकरीता बंद मार्ग :-**

**दि. २७/०९/२०२३ व दि. २८/०९/२०२३ रोजी सकाळी ०६.०० ते २४.०० वा. आवश्यकतेनुसार**

१) **काळेपडळ अंडरपास येथून ससाणेनगर मेन रोडकडे येणारी वाहतूक बंद करण्यात येत आहे.**
- ✓ **पर्यायी मार्ग :-** काळेपडळ अंडरपास, समृध्दी सोसायटी उजवीकडे वळून रवी पार्क रोडने हांडेवाडी रोड, डावीकडे वळून ससाणेनगर अंडरपास येथून इच्छितस्थळी

२) **काळेपडळकडून नवनाथ चौक गणपती मंदिराकडे येणारी तसेच डी.मार्ट मार्गे ससाणेनगर मेन रोडकडे येणारी वाहतूक बंद करण्यात आहे.**
- ✓ **पर्यायी मार्ग :-** काळेपडळ, तुकाई दर्शन, गोंधळेनगर, हडपसर गाडीतळ येथून इच्छितस्थळी

३) **न्यु इंग्लिश स्कुल डी.पी. रोड (ससाणेनगर अंडरपास) येथुन ससाणेनगर मेनरोडकडे येण्यास बंदी करण्यात येत आहे.**
- ✓ **पर्यायी मार्ग :-** ससाणेनगर अंडरपास सैय्यदनगर, हांडेवाडी रोड, रवी पार्क रोडने काळेपडळ अंडरपास येथुन इच्छितस्थळी किंवा ससाणेनगर अंडरपास, वैदुवाडी / रामटेकडी मार्गे इच्छितस्थळी

४) **हडपसर येथुन ससाणेनगर रोडने सय्यदनगरकडे जाणारी वाहतूक एस.बी.आय. बँकेशेजारील डी.मार्ट मार्गे काळेपडळकडे वळविण्यात येत आहे.**

तरी नागरिकांनी वरील प्रमाणे पर्यायी मार्गाचा वापर करुन वाहतूक कोंडी टाळणेकरीता वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे असे आवाहन वाहतूक शाखेमार्फत करण्यात येत आहे.

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

प्रत :- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३ वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी, वाहतुक शाखा पुणे शहर

प्रत

पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा पुणे शहर